**आरंभ**

**वादी साक्षीदार क्र.१ काशीराम रामलाल परतेकी चा शपथेवर उलट तपास प्रतिवादी क्र.१ व २ तर्फे ॲड. एम.सी. खंगारे वकील**

**३६.** **प्रश्न** : तुम्ही ७/१२ वर नोंद पटवाऱ्याला पैसे देवुन केली आहे काय ?

**उत्तर** : नाही

कोतवालाने सांगितले होते की, प्रतिवादी हा शेत विकतो व कब्जा माझा आहे असे तलाठयाला सांगितल्याने तलाठयाने माझे नाव ७/१२ वर लावले. तलाठयाने माझे नावाचा फेरफार घेतला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, माझे नाव चुकीने दावा मिळकतीच्या ७/१२ उतारावर लागलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी दावा मिळकत विक्री करण्याची परवानगी जिल्हाधिकारी, नागपूर यांना मागितली होती त्यावर प्रतिवादीने आक्षेप नोंदविला होता. दिनांक १९.०७.२०१० चा करारनामा नि. क्र. ३२ चा स्टॅम्प मी विकत घेतला होता. तसेच दुसरा करारनामा नि. क्र. ३१ चा स्टॅम्प सुध्दा मी विकत घेतला होता. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.३३ वर साक्षीदार म्हणुन माझे नाव टाईप केले होते ते खोडण्यात आलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदरचा दस्त खोटा तयार केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र.३८ खोटा तयार केला आहे. हे म्हणणे खरे आहे की, ठेकेपत्र नि.क्र.३९ चा स्टॅम्प मी विकत घेतला आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या स्टॅम्पवर लिहुन देणार व दुसरा साक्षीदार यांची सही. हे म्हणणे खरे आहे की, २०१२ मध्ये दावा मिळकत हसंराज, अमरसिंग व रेखा यांच्या नावाने ७/१२ उतारा होता. हे म्हणणे खरे नाही की, ठेकापत्र नि.क्र.३९ खोटे आहे. हे म्हणणे खरे नाही की, उपविभागीय अधिकारी यांना दिलेला अर्ज नि.क्र.४७ खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, कलम १४९ ची नोटीस नि.क्र.५३ खोटी आहे. हे म्हणणे खरे नाही की, अदखलपात्र गुन्हा नोंद क्रमांक ४८३/१५ नि.क्र.५७ मी खोटा दाखल केला आहे.

३७. हे म्हणणे खरे आहे की, मी प्रतिवादीला तीन वेगवेगळया वकीलांमार्फत तीन नोटीसेस पाठविल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, केदार वकीलामार्फत मी फक्त ठेकेपत्रासाठी प्रतिवादीला नोटीस पाठविली होती. मला हे माहित नाही की, त्या नोटीसला ॲड. खंगारे मार्फत उत्तर दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी ॲड. प्रशांत मिरासे व नितीन बरगट यांच्यामार्फत प्रतिवादीला खोटया नोटीसा पाठविल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीवर सुरवातीपासुन प्रतीवादींचा ताबा आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या दाव्यामध्ये व सरतपासामध्ये माझा ताबा असल्याचे मी खोटे लिहिलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, कलेक्टरला शेत विक्री करण्याची परवानगी देण्याचा अधिकार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी चुकीची परवानगी घेतलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे दस्तावेज दाखल केलेले आहे.
**मध्यानाची वेळ झाल्यामुळे उलट तपास मध्यानानंतर ठेवण्यात आला.**

सावनेर
दिनांक : ०१.११.२०२३

समक्ष
श्रवणोत्तर स्वीकृत

(एस.ए.सरदार)
दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर, सावनेर
तालुका सावनेर, जिल्हा - नागपूर

मी अशिक्षित आहे. मला मराठी लिहिता वाचता येत नाही परंतु सही करता येते. माझे सरतपास हे मराठी मध्ये आहे. असे काही घडले नाही की, माझे सरतपास इंग्रजी भाषेमध्ये तयार केला. मी मागील चाळीस पन्नास वर्षापासुन खापरखेडा येथे राहतो. त्यापुर्वी पारेघाट मध्य प्रदेश मध्ये राहत होतो. हे म्हणणे खरे आहे की, महाराष्ट्र राज्यामध्ये माझ्याकडे शेती नाही. हे म्हणणे खरे आहे नाही की, प्रतिवादीनी शेती विकल्याची जाहिरात केली नव्हती. जाहिरात सन २०१० मध्ये केली होती. सदरची जाहिरात हे त्याने माझ्या घरी येवुन केली होती. प्रतिवादीने लेखी स्वरूपात जाहिरात दिली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, त्याने त्याच्या शेतामध्ये शेत विकणे आहे, असा बोर्ड लावला नव्हता. मी जनतेकडुन हरकत मागण्याची नोटीस वर्तमान पत्रात दिली नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीसोबत माझा सौदा झाला नव्हता, म्हणुन मी जाहिरात दिली नव्हती.

दावा मिळकतीचा सर्व्हे नं. १८४, १६५ आहे. मला त्याचे क्षेत्रफळ

सांगता येणार नाही. सर्व्हे नं. १८४ चे दक्षिणेला डोमाजी मेश्राम, पुर्वेला शंकर कुंभरे यांचे शेत, पश्चिमेला भैयाजी घुर्जे यांचे शेत, उत्तरेला प्रतिवादीचे शेत व नाला, असे आहे. सर्व्हे नं. १६५ चे पुर्वेला बोरकर यांचे शेत, पश्चिमेला भोगोजी बागडे यांचे शेत, दक्षिणेला शंकर कुंभरे यांचे शेत, उत्तरेला भोगोजी बागडे यांचे शेत, असे आहे. मी दावा तयार करतांना असेच चर्तुसिमा वकीलांना सांगीतले होते. मला सदरहु चर्तुसिमे शेजारील शेतक-यांचे शेत सर्व्हे नं. सांगता येणार नाही. मी दावा तयार करतांना शेत सर्व्हे नं. सांगीतले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे चर्तुसिमा सांगीतले. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगीतलेले चर्तुसिमा वाद मिळकतीच्या नाही.

दावा मिळकत वडिलोपार्जित आहे, हे दर्शविणारे दस्ताऐवज मी दाखल केला आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदरहु मिळकत अमरसिंग यांची वडिलोपार्जित मिळकत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदरहू मिळकत अमरसिंग यांची वडिलोपार्जित आहे, हे दर्शविणारे दस्ताऐवज मी दाखल केले नाही. मला त्या दस्ताऐवजांचे नाव सांगता येणार नाही. दावा मिळकत प्रतिवादीच्या नावावर येण्यापुर्वी कोणाच्या नावावर होती व कशी आली, हे मला माहिती नाही. मी व प्रतिवादी गोंड समाजाचे आहे, म्हणुन मी जातीचे प्रमाणपत्र आमच्या दोघांचे दाखल केलेले आहे. मी माझे जातीचे प्रमाणपत्र तहसीलदार सौंसर जिल्हा छिंदवाडा यांच्याकडुन घेतलेला आहे. आता मला माझे जातीचे प्रमाणपत्र निशाणी क्र. ३४ दाखविले त्यावर अनुविभागीय अधिकारी म्हणुन नायब तहसीलदार यांनी सही केली की नाही, हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी माझे खोटे जातीचे प्रमाणपत्र दाखल केले. सदरहु जातीचे प्रमाणपत्र कोणत्या वर्षीचे आहे, हे माझ्या लक्षात नाही. मी मध्य प्रदेशात येथे राहत असतांना सदरचे प्रमाणपत्र घेतले आहे.

मला करारनाम्याची दिनांक सांगता येणार नाही. सदरचा करारनामा सावनेर येथे तयार केला होता. सदर दस्ताची नोटरी नागपुर येथे तयार केली. करारनामा केल्यानंतर किती दिवसांनी नोटरी केली, हे माझ्या लक्षात नाही. सन २०१० मध्ये सावनेरला नोटरी होती किंवा नाही, हे मला सांगता येणार नाही. करारनाम्यामध्ये काय लिहिले आहे, हे मला सांगता येणार

नाही. दोन करारनामा तयार केलेले होते. सदरचे करारनामे हे खरेदीबाबतचे होते, संपुर्ण मजकुर मला सांगता येणार नाही. नोंदणीकृत म्हणणे काय, हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, करारनामा नोंदणीकृत नाही. हे म्हणणे खरे आहे की, दोन्ही करारनामे खोटे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, दोन्ही करारानाम्यावर प्रतिवादीचे सहया नाही. हे म्हणणे खरे नाही की, करारनाम्यावर दोन्ही स्टॅम्प मी खरेदी केले होते. साक्षदार स्वतःहुन सांगतो की, ते स्टॅम्प प्रतिवादीनी खरेदी केले होते. हे म्हणणे खरे नाही की, जे स्टॅम्प प्रतिवादीनी खरेदी केलेले होते, त्यावर करारनामा लिहिण्यात आलेला होता. साक्षदार स्वतःहुन सांगतो दुसरे स्टॅम्प घेतले होते. सदरचे स्टॅम्प मी स्वतः विकत घेतले होते व त्यावरच करारनामा लिहिला होता.

मी कास्तकारी करतो. माझी शेती पारेघाट मध्य प्रदेश येथे आहे. हे म्हणणे खरे आहे की, खापरखेडा गावावरून जावुन शेती करीत होतो. ते अंतर ६०-७० किलोमीटर असेल. मी त्या शेतीचा हिशोब ठेवला नाही. हे म्हणणे खरे नाही की, सन २०१० मध्ये ६ ते ७ लाख माझ्याकडे होते, हे दर्शविणारा दस्ताऐवज माझ्याकडे नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी तसे दस्ताऐवज न्यायालयात दाखल केलेला नाही.

प्रश्न : दावा मिळकतीवर तुमचा ताबा होता, हे दर्शविणारा राजस्व विभागाचा दस्त तुम्ही दाखल केलेला आहे का ?

उत्तर : होय, माझ्या नावाची नोंद होती परंतु प्रतिवादीनी ती नोंद कमी केली.

हे म्हणणे खरे नाही की, मी दाखल केलेले ७ बाराचे माझे नोंदी खोटे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आमुखत्यारपत्र निशानी क्र. ३३ मी खोटे तयार केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी जे प्रतिवादीच्या नावाचे दस्त दाखल केलेले आहे, ते सर्व खोटे आहेत व त्यावर प्रतिवादीचे सहया नाहीत.

**प्रतिवादीच्या वकिलांच्या तोंडी विनंतीवरून उलट तपास पुढे ढकलण्यात येते.**

स्पे. दि. दावा क. ३३/२०२२
कांशीराम वि. हंसराज
नि.क्र.२८

सावनेर
दिनांक : २९.०९.२०२३

समक्ष
श्रवणोत्तर स्वीकृत

(एस.ए.सरदार)
दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर, सावनेर
तालुका सावनेर, जिल्हा - नागपूर

***CERTIFICATE***

I affirm that the contents of this PDF file are word to word as per original file.

Mrs. A. J. Chichate
Stenographer(Grade-II)